INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# जैन समाजाचे सोलापूर शहराच्या विकासातील योगदान

डॉ. एस. एन. गायकवाड
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग ,
श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली.

## प्रास्ताविकः

पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर शहर अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. सोलापूर शहर त्याच्या विशिष्ट भौगोलिक व औद्योगिक परिस्थितीमुळे महाराष्ट्रातील इतर शहरापेक्षा वेगळे आहे. सोलापूर हे प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत कोणत्याही राजकीय सत्तेच्या राजधानीचे ठिकाण नव्हते. त्यामुळे कोणत्याही राजघराण्याचा प्रभाव जाणवत नाही. ब्रिटीश कालखंडात सोलापूर वस्त्रोद्योगात आघाडीवर राहिले. त्यामुळे देशभरातून अनेक लोक कामधंदा, उद्योग व व्यवसाय यासाठी सोलापुरात येऊन स्थायिक झाले. त्याचबरोबर सोलापूर कर्नाटक व आंध्रप्रदेश यांच्या सीमेवर असल्यामुळे त्यांचाही प्रभाव जाणवतो. याच कारणाने सोलापूरमध्ये प्रमुख सोळा भाषा बोलल्या जातात. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, पद्मशाली अशा विविध समाजाचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. प्रत्येक शहराच्या विकासात त्या शहरातील नागरिकांची भूमिका महत्वाची असते. सोलापुरच्या विकासात सर्वच समाजातील लोकांचा सहभाग असला तरी सोलापूरमध्ये जैन समाजाचे आगमन झाल्यापासून सोलापूरचा विकास वेगाने घडून आला. सोलापूरच्या सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकासात मोलाचा वाटा जैन समाजाने उचलला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात सोलापूर शहराच्या विकासात जैन समाजाने दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला आहे.

## जैन समाजाची सोलापूर शहरातील वसाहतः

सोलापूरमध्ये जैन समाज खूपच उशिरा म्हणजे अठराव्या शतकात स्थायिक झाला. हा समाज संख्येनेसुद्धा कमी आहे. सामाजिक, सांस्कृतिक व रुढीपरंपरा यांच्याबाबतीत हा समाज आपले वेगळेपण जपून आहे. शांत, सहिष्णू, अहिंसावादी व इतरांच्या सामाजिक जीवनात हस्तक्षेप न करता शांततेने जीवन जगणारा हा समाज सोलापूरच्या विकासातील महत्वाचा घटक आहे. सोलापूरातील सर्व समाजाबरोबर सलोख्याचे संबंध ठेवून परस्परांच्या सहकार्याने शहराच्या विकासात महत्वाची भूमिका या समाजाने पार पाडली आहे. हा समाज व्यापार आणि



उद्योगधंद्यातून मोठ्या प्रमाणात संपत्ती मिळवतो. मिळविलेल्या संपत्तीपैकी बराच भाग समाजाच्या विकासासाठी खर्च करतो. हा या समाजाचा स्थायी भाव आहे. पेशवाईत अठराव्या शतकात गुजरातमध्ये मोठा दुष्काळ पडला होता. म्हणून जैन समाजातील कांही कुटुंबे सातारा जिल्ह्यातील फलटण येथे स्थलांतरित झाली. त्या दरम्यान व्यापार व सावकारी हा या कुटुंबांचा प्रमुख व्यवसाय होता. याच काळात सोलापूर शहराच्या विकासासाठी पेशवे थोरले माधवराव यांचे प्रयत्न चालू होते. त्यांच्या प्रयत्नाने सोलापूर शहरचा औद्योगिक विकास घडू लागला होता. त्यामुळे भांडवलाची गरज असावी व जैन समाज हा भांडवल पुरवठा करण्यासाठी सावकारकीचा व्यवसाय करीत असल्याने या समाजातील कांही लोक सोलापूर येथे स्थायिक झाले. सोलापूरमध्ये त्यांचे कायम वास्तव्य झाल्यानंतर त्यांनी शहराच्या विकासाला अनेक मार्गांनी हातभार लावला. ते सोलापूर शहराच्या ज्या भागात कायम वास्तव्य करून राहू लागले तो भाग आज फलटण गल्ली म्हणून ओळखला जातो. सोलापूर शहराच्या सुती कापड व्यवसायातील भरभराटीमुळे अनेक जाती धर्माचे लोक देशाच्या विविध भागातून येवून सोलापूर शहरात स्थायिक झाले. सोलापूर शहरातील प्रमुख जाती जमातीपैकी मांग, महार, कुणबी बारा बलुतेदार आणि बारा अलुतेदार व इतर जाती मूळ निवासी आहेत. बाराव्या शतकात वीरशैव धर्माच्या उदयानंतर लिंगायतांची संख्या वाढत गेली. चौदाव्या शतकात मुस्लीम राजवटींच्या काळात मुस्लीम लोक स्थिरावले. पुढे सोलापूर शहरावर मराठ्यांची सत्ता निर्माण झाल्यानंतर मराठा व इतर हिंदू धर्मियांची संख्या वाढत गेली.पेशव्यांच्या काळात पद्मशाली समाजाची संख्या वाढत गेली. थोरले माधवराव पेशवे यांनी सोलापूर शहराच्या विणकाम व्यवसायाच्या प्रगतीसाठी तेलंगणातून पद्मशाली लोकांनी सोलापूर शहरात येवून वसाहत करावी यासाठी प्रोत्साहन दिले.पेशव्यांच्याच काळात जैन समाजतील लोक व्यापार व व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झाले. ब्रिटीश कालखंडात ख्रिश्चन धर्मियांची संख्या वाढत गेली.[१] थोडक्यात सोलापूर शहर म्हणजे अनेक जाती-जमातींचे मिश्रण आहे. अशा विविध जाती जमातीच्या सोलापूर शहरात राहून जैन समाजाने आपले वेगळेपण दाखवून देत सोलापूर शहराच्या विकासासाठी मोलाचा हातभार लावला. जैन समाज सोलापूर शहरात स्थायिक होत असताना व्यापार उद्योगाच्या स्पर्धेतून लिंगायत समाजाबरोबर त्यांचा वारंवार संघर्ष होवून तणाव निर्माण होत असे. मात्र थोड्या कालावधीनंतर दोन्ही समाजातील संबंध सुरळीत होत गेले. तसेच जैन समाज त्या कालखंडात अस्पृश्यता पाळत असल्याने हिंदू धर्मातील अस्पृश्य समाजाशी अंतर ठेवून वागत असे.[२] काळाच्या ओघात याही बाबतीत या समाजाने जुळवून घेतले. हे दोन अपवाद वगळता जैन समाज सोलापूर शहराच्या विकासाच्या प्रत्येक मुद्यावर सहकार्य करण्यास नेहमीच तयार असे. हिराचंद नेमचंद वाचनालय, सरस्वती मंदिर, सेवासदन इत्यादी सोलापूर शहरातील प्रमुख संस्थांच्या स्थापनेत जैन समाजाने महत्वपूर्ण भूमिका बजावली.

### सोलापूर शहरातील पहिले बोर्डींग:

जैन धर्मामध्ये दानधर्माला अतिशय महत्व आहे. त्यासाठी चतुर्विधदान शाळेची स्थापना करण्यात आली. या शाळेची देखभाल व व्यवस्था सर्व जैन समाजाच्या वतीने करण्यात येत असे. या शाळेच्यावतीने अन्नदान, अभयदान, औषधदान व ज्ञानदान करण्यसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. पुढे या चतुर्विधदान शाळेच्या चारही शाखांची प्रगती होवून अन्नदानासाठी बोर्डिंग सुरु करण्यात आले. गायींना संरक्षण देण्यासाठी पांजरपोळ सुरु केले. गोरगरीब व गरजूंसाठी औषधालय चालविले. ज्ञानदानासाठी पाठशाला सुरु केली.[३] या त्यांच्या धार्मिक कार्यातून सोलापूर शहरातील समाजाची खूप मोठी सोय झाली. मुंबई प्रांतामध्ये विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मुंबईचे माणिकचंद हिराचंद, सोलापूरचे हिराचंद नेमचंद, आणि अकलूजचे रामचंद नाथा गांधी या जैन समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती होत्या. त्यांनी स्वतःला आपल्या समाजाच्या विकासासाठी वाहून घेतले होते. शैक्षणिक विकासाच्या दृष्टीकोनातून मुंबईमध्ये सुरु केलेले हिराचंद गुमानजी जैन बोर्डींग हे मुंबई पहिले जैन बोर्डींग होते. त्यानंतर अकलूजचे रामचंद नाथा गांधी यांनी सोलापूरच्या हिराचंद नेमचंद दोशी यांच्या मदतीने १२ मार्च १९०८ रोजी गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन बोर्डींग सुरु केले.जैन

समाजातील गरीब विद्यार्थ्यांना राहणे आणि जेवणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरु केलेल्या या बोर्डिंगने विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ग्रंथालयसुद्धा सुरु केले. या बोर्डींगमधील विद्यार्थी आपले शिक्षण जैन पाठशाळेत घेत होते. या वसतिगृहाचा उपयोग शिक्षणाबरोबरच उत्तम व्यक्तिमत्वाचे विद्यार्थी निर्माण व्हावेत यासाठी केला जात होता. स्वातंत्र्यलढा चालू असताना या वसतिगृहामध्ये स्वातंत्र्यसैनिकांच्या अनेक महत्वपूर्ण बैठका होवून निर्णय घेतले गेले.[४]स्वातंत्र्य चळवळ सुरु असताना आणि स्वातंत्र्य मिळाल्यावर हैद्राबाद राज्यात रझाकारांनी निर्माण केलेल्या दहशतीमुळे अनेक लोकांनी सोलापूरमध्ये स्थलांतर केले. त्यांना आश्रय देण्याचे काम या बोर्डींगने केले.[५]

## वैद्यकीय सुविधा:

जैन समाजामध्ये गरजूंना औषध दान देणे हे धार्मिक कार्य मानले जाते. सखाराम नेमचंद दोशी यांनी १९१७ साली सखाराम नेमचंद जैन औषधालयाची स्थापना केली.[६]या औषधालयाचे प्रमुख वैद्य बागेवाडीकर यांनी सुचविल्यानुसार शेठ गोविंदजी रावजी दोशी यांनी १९५६ मध्ये औषधालयाला जोडून रुग्णालय सुरु केले. त्यानंतर वैद्य बागेवाडीकर यांनी कांही विद्यार्थ्यांना पारंपारिक वैद्यकीय शिक्षण देण्यास सुरुवात केली. १९६२ मध्ये रुग्णालयाला जोडून शेठ गोविंदजी रावजी दोशी आयुर्वेदिक कॉलेज सुरु केले.[७]

## जैन पाठशाळेची कामगिरी:

जैन समाजाने ज्ञानदानासाठी १८८५ मध्ये जैन पाठशाळा सुरु केली.[८] ही सोलापूरमधील सर्वात जुनी व पहिली खाजगी शिक्षण संस्था आहे. १९१० मध्ये या पाठशाळेचे नामांतर श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर पाठशाळा असे करण्यात आले. काळाच्या ओघात विद्यार्थी संख्या व इमारतींची संख्या जशी वाढत गेली त्याप्रमाणे या पाठशाळेची उपयुक्तता शहरवासीयांसाठी वाढत गेली.[९] ही पाठशाळा मराठी, संस्कृत व इंग्रजी या तीन विभागामध्ये चालविली जात होती. मराठी विभागात मोडी व गणित, संस्कृत विभागात धार्मिक विषय, कविता व व्याकरण तर इंग्रजी विभागात इयत्ता तिसरी पर्यंत शिक्षण दिले जात होते. पुरेशा संस्कृत अध्ययनानंतर विद्यार्थ्यांना आयुर्वेदिक शिक्षणासाठी सातारा येथे अर्यांग्ल वैदिक स्कूलला पाठविले जात होते. हिराचंद नेमचंद दोशी व त्यांच्यानंतर रावजी सखराम दोशी यांनी पाठशाळेची देखभाल केली.[१०] १९३६ मध्ये पाठशाळेच्या इंग्रजी विभागाचे रुपांतर माध्यमिक शाळेमध्ये केले.[११] मात्र सरकारच्या शिक्षण विभागाकडे नोंदणी केल्या नंतर ब्रिटीश शिक्षण पध्दतीतील फोलपणा जाणवला. त्यामुळे पाठशाळा व हायस्कूल यांनी १९४० पासून गुरुकुल शिक्षण पद्धतीचा स्वीकार केला.[१२] १९६० साली पाठशाळेने ७५ वर्षे पूर्ण केली म्हणून आणि सोलापूर शहराची तांत्रिक शिक्षणाची गरज लक्षात घेवून तांत्रिक हायस्कूल सुरु करण्याचे ठरविले.१९६२ साली शहरातीलच नव्हे तर जिल्ह्यातील पहिले तांत्रिक हायस्कूल पाठशाळेने सुरु केले. कालांतराने पाठशाळेचे रुपांतर तांत्रिक हायस्कूलमध्ये झाले. या हायस्कूलचा विकास होवून १९८३ साली वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या महाराष्ट्रतील एका नामांकित कॉलेजमध्ये रुपांतर झाले. पाठशाळेने ७५ वर्षे पूर्ण केली त्याच वर्षी उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय सुरु करण्याचे ठरविले. २० जून १९६२ रोजी वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय सुरु झाले. १९६६ साली श्रीमती कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय सुरु केले. १९७२ साली हिराचंद नेमचंद कॉमर्स कॉलेज सुरु झाले. अशारीतीने पाठशाळेच्या व्यवस्थापनाखाली ज्ञानदानाच्या उद्देशाने १६ पेक्षा जास्त शाखा चालवून सोलापूरच्या विकासाला हातभार लावला आहे.[१३]

## शैक्षणिक विकासातील योगदान:

सोलापूर शहरात २८ फेब्रुवारी १८५३ रोजी शहरातील लोकांनी, लोकांसाठी नेटिव्ह जनरल लायब्ररीची स्थापना केली.[१४] तेंव्हापासून हे ग्रंथालय १८४० साली स्थापन झालेल्या सरकारी शाळेत सुरु करण्यात आले. परंतु स्वातंत्र्याची चळवळ सुरु झाल्यानंतर सरकारने शाळा, कॉलेजबरोबरच ग्रंथालयांनाही नोंदणी करणे आवश्यक केले. परंतु ग्रंथालयाची नोंदणी करून अनुदान घेण्यास चालकांनी नकार दिला. सरकार व नगरपालिकेने आपल्या जागेतून ग्रंथालय हलविण्यास सांगितले. तेंव्हा अडचणीच्यावेळी सोलापूर शहरातील जैन समजाचे नेते हिराचंद नेमचंद दोशी यांनी १४,५५०/- रुपये देणगी दिली. त्यामुळे ग्रंथालयाला स्वतःची इमारत मिळाली. ग्रंथालयाच्या शतक महोत्सवावेळी त्यांचे चिरंजीव गुलाबचंद हिराचंद दोषी यांनी २०,०००/- रुपये देणगी दिली. त्याचवेळी ग्रंथालयाचे नामकरण हिराचंद नेमचंद ग्रंथालय असे करण्यात आले.[१५] सोलापूर शहरात स्त्रियांच्या विशेषतः प्रौढ स्त्रीयांच्या शिक्षणासाठी 'श्री सरस्वती मंदिर सोसायटी' ही संस्था २८ सप्टेंबर १८९५ रोजी सुरु करण्यात आली. त्यासाठी लोकहितवादीचे चिरंजीव व सोलापूरचे तत्कालीन कलेक्टर अप्पासाहेब देशमुख, प्रार्थना समाजाचे कार्यकर्ते व सोलापूरचे तत्कालीन न्यायाधीश गोविंदराव कानिटकर यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर शहरातील विविध समाजातील लोकांनी एकत्र येवून स्त्री शिक्षणासाठी मोठे कार्य केले. या संस्थेला हिराचंद नेमचंद दोषी यांनी १२,२५०/- रुपये देणगी देवून हायस्कूलसाठी इमारत उपलब्ध करून दिली. त्यामुळे त्यांच्या पत्नीचे नाव हायस्कूलला दिले. सकुबाई हिराचंद नेमचंद मुलींचे हायस्कूल आज सोलापूर शहरातील नामवंत हायस्कूल आहे.[१६] श्री. रामलाल परदेशी यांनी आपल्या पत्नीच्या नावे हायस्कूल सुरु करण्यासाठी सोलापूर नगरपालिकेला २०,०००/- रुपये देणगी दिली. मात्र कांही कारणांनी नगरपालिकेने हायस्कूल सुरु न करता प्राथमिक शाळा सुरु केली.१९३५ साली ही शाळा नगरपालिकेने सेवासदनला चालविण्यासाठी दिली तेंव्हा तिचे रुपांतर सुरजाबाई रामलाल गर्ल्स हायस्कूलमध्ये झाले. सेवासदन ही पुणे सेवासदनची शाखा सोलापूर शहरात १९२३ साली सुरु झाली. शेठ गोविदरावजी दोशी यांनी या संस्थेला आपली प्रथम पत्नी गजराबाई यांच्या नावे मुलींसाठी वसतिगृह बांधण्यासाठी १०,०००/- रुपये दिले व त्याच्या विस्तारासाठी २०,०००/- रुपये दिले. तसेच आपली दुसरी पत्नी कुमुदिनीबाई यांचे नावे कलामंदिर बांधण्यासाठी ३०,०००/- रुपये दिले. या शैक्षणिक संस्थांना अडचणीच्यावेळी केलेल्या मदतीमुळे सोलापूर शहराची शैक्षणिक प्रगती होण्यास मदत झाली.[१७]

## औद्योगिक विकासातील योगदान:

सोलापूर शहराच्या आर्थिक व औद्योगिक विकासात जैन समाजातील व्यक्तीचा मोठा सहभाग आहे. या समाजातील अनेक व्यक्तींनी शहरातील जास्तीत जास्त सूतगिरण्या तसेच कापडगिरण्या चालविल्या.शहरात जुनी गिरणी (१८७७), नर्सिंग गिरजी मिल (१९९८)आणि जाम मिल (१९०९)[१८]या मोठ्या कापडगिरण्या जैन समाजातील लोकांनी सुरु केल्या. जुनी गिरणी ही कापडगिरणी तर आशिया खंडातील सर्वात मोठी कापडगिरणी होती. पहिले व दुसरे महायुध्द या दरम्यानच्या काळात या कापडगिरण्यांचा मोठा विकास झाला. त्यामुळेच सोलापूर हे एक काळ गिरणगाव म्हणून ओळखले जात होते. महाराष्ट्रात मुंबईनंतर कापडउद्योगाबाबत सोलापूरचा दुसरा क्रमांक लागत होता. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात चुकीच्या राजकीय चळवळी व राजकीय हस्तक्षेप यामुळे आशिया खंडातील सर्वात मोठी कापडगिरणी असलेली जुनी मिल १९६४ मध्ये कायमची बंद झाली. तरीसुध्दा राजकीय हस्तक्षेप थांबला नाही. त्यामुळे पुढच्या काळात इतर कापडगिरण्या बंद पडल्या. त्यानंतर यंत्रमागांची संख्या वाढत गेली. या कापडगिरण्यांची निर्मिती होत असतानाच सोलापूर शहराला औद्योगिक शिक्षणाची गरज भासू लागली. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून ही गरज प्रकर्षाने जाणवू लागली. मुंबई प्रांतातील औद्योगिक शहरातून औद्योगिक शाळा सुरु करण्याची सरकारला आवश्यकता वाटू लागली. त्याचवेळी सोलापूर नगरपालिकेनेसुध्दा अशी शाळा सुरु करण्याचा प्रयत्न केला. मात्र या दोन्ही प्रयत्नांना अपयश आले. मोरारजी गोकुळदास मिलचे एजंट शेठ विरचंद दीपचंद यांनी सोलापूर शहराच्या

औद्योगिक विकासासाठी उपयुक्त ठरणाऱ्या तांत्रिक शिक्षणात रस घेतला. सरकार आणि नगरपालिकेने औद्योगिक शाळा सुरु करण्याचे लांबणीवर टाकलेले काम विरचंद दीपचंद यांनी स्वतःच्या जबाबदारीवर पूर्ण करण्याचे ठरविले. १८९९ मध्ये शहरात दोन औद्योगिक शाळा सुरु केल्या. या शाळा शहरातील पहिल्या औद्योगिक शाळा होत्या. या दोन शाळांपैकी एक शाळा मुलींसाठी व दुसरी मुलांसाठी होती. ज्या काळात मुली शाळेत पाठविल्या जात नव्हत्या त्या काळात मुलींसाठी औद्योगिक शाळा सुरु करण्याची कल्पना त्यांच्या सुधारणावादी दूरदृष्टीकोनाचे फळ होते. या शाळा प्रामुख्याने कापडगिरणीत कामाला असलेल्या कामगारांच्या मुलामुलींसाठी सुरु केल्या होत्या. या शाळेच्या अभ्यासक्रमात वाचणे, लिहिणे, गणित, चित्रकला, सुतारकाम, मशीन काम, शिलाई मशीन, इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात होते.[१९] हा अभ्यासक्रम सोलापूर शहराच्या औद्योगिक विकासासाठी उपयुक्त होता. या शाळेने उद्योगधंद्यांना प्रशिक्षित कामगार पुरविण्याचे काम केले. वालचंद उद्योग समूहाने महाराष्ट्राला व देशाला आर्थिक विकासाच्याबाबतीत मोठा सहयोग दिला.[२०] या क्षेत्रात हिराचंद नेमचंद, वालचंद हिराचंद इत्यादी व्यक्तींनी आपली कर्तबगारी सिध्द केली आहे.

## स्वातंत्र्य चळवळीतील योगदान:

भारतीय स्वांतंत्र्य चळवळीतील या समाजाचे योगदान महत्वपूर्ण आहे. हिराचंद नेमचंद दोशी हे सोलापूर शहरातच नव्हे तर मुंबई प्रांतात आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठित व्यक्ती होती. ब्रिटीश सरकारच्या दृष्टीकोनातून त्यांचा स्वातंत्र्य चळवळीशी कसलाही संबंध नव्हता. त्यामुळे सरकार दरबारी त्यांचे वजन होते. याचा फायदा घेवून त्यांनी अनेक क्रांतीकारकांना अनेकवेळा आश्रय दिला.[२१] लोकमान्य टिळक, लाला लाजपत राय व बिपिनचंद्र पाल यांनी बंगालच्या फाळणीनंतर बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळीसाठी १९०६ साली आपापल्या प्रदेशात दौरे आयोजित केले.लोकमान्य टिळकांनी सोलापूरला ६ फेब्रुवारी १९०६ रोजी भेट दिली व लोकांना राष्ट्रीय शिक्षणासाठी पैसा फंड उभारण्यासाठी सहकार्य करण्याचे अवाहन केले. टिळकांच्या भेटीदरम्यान 'जैन बालोत्तेजक समाज'च्या सदस्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले. त्यापैकी देवचंद शहा (जैन गुरुकुल चळवळ सुरु करणारे संत समंतभद्रजी महाराज), मोतीचंद पद्मसी(स्वातंत्र्य चळवळीच्या क्रांतिकार्यात निमच महंत केसमध्ये फाशीची शिक्षा झालेला क्रांतिकारक),वालचंद देवचंद निंबर्गीकर व वालचंद नेमचंद शहा इत्यादींनी स्वातंत्र्य लढ्यात आणि सामाजिक कार्यात स्वतःला झोकून दिले.[२२]

इ.स. १९१५ मध्ये देवचंद शहा, मोतीचंद पद्मसी, वालचंद निंबर्गीकर, आणि वालचंद नेमचंद शहा हे सोलापूरचे सर्व विद्यार्थी जयपूर या ठिकाणी जैन धर्माचे धार्मिक शिक्षण घेण्यासाठी गेले होते.ते रहात असलेले जैन शिक्षण प्रसारक समितीचे वसतीगृह अर्जुनलाल शेठी चालवत होते. हे वसतीगृह शैक्षणिक कमी व क्रांतिकारी कार्यात जास्त गुंतलेले होते. या विद्यार्थ्यांपैकी मोतीचंद पद्मसी हा अर्जुनलाल शेठीसह क्रांतिकार्यात सहभागी झाला.क्रांतिकार्यासाठी पैशाची गरज असल्याने अर्जुनलाल शेठीच्या मार्गदर्शनाखाली मोतीचंद पद्मसी, जोहारसिंगआणि जयचंद यांनी बिहारमधील नीमच गावात हिंदू मंदिरात दरोडा घालण्याचे ठरविले. त्यांना मंदिरातील हिंदू पुजाऱ्याकडून पैसे पाहिजे होते. परंतु त्यांच्या हातून अनाहूतपणे पुजारी मारला गेला. संबंधित पोलीस स्टेशनमध्ये केस नोंदवली गेली. पुराव्याअभावी केस बंद केली गेली. मात्र कांही दिवसानंतर अर्जुनलाल शेठीचा जवळचा मित्र शिवनारायण द्विवेदी मुंबई पोलिसांना इतर गुन्ह्यात संशयित म्हणून सापडला. दिल्लीत लॉर्ड हर्डींग्ज यांच्यावर झालेल्या बॉम्ब हल्यासंबंधी पोलीस चौकशी करीत होते. त्याने चौकशीत नीमच याठिकाणी झालेल्या दरोड्याची माहिती दिली. मुंबई पोलिसांनी ही माहिती ताबडतोब निमच पोलिसांना कळविली. त्यामुळे बंद झालेली केस पुन्हा उघडली गेली. पोलिसांनी अर्जुनलाल शेठी, मोतीचंद पद्मसी व माणिकचंद यांना अटक केली. पोलिसांनी माणिकचंद यांना माफीचा साक्षीदार केले. निमचमधील

मंदिरातील नोकरांनी पद्मासीला ओळखले. त्यामुळे आरा न्यायालयामध्ये केस सुरु झाली. सर्व प्रयत्न करूनही पद्मसी दोशी आढळला. त्यामुळे न्यायालयाने फाशीची शिक्षा ठोठावली. त्यांनी वंदेमातरमच्या घोषणा देत आनंदाने शिक्षेचा स्वीकार केला.[२३]

लोकमान्य टिळकांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर पुन्हा राष्ट्रीय शिक्षणासाठी प्रयत्न सुरु केले. टिळकांनी १९१८ साली सोलापूरला भेट दिली त्यावेळी रावजी देवचंद यांनी पुढाकार घेवून राष्ट्रीय शिक्षणासाठी १००० रुपयांचा निधी जमा केला. टिळकांच्या मृत्युनंतर महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाची लाट निर्माण झाली. महाराष्ट्रातील प्रत्येक तालुका व जिल्हा पातळीवर राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा सुरु झाल्या. गांधीजींनी असहकार चळवळीची घोषणा केल्यानंतर सरकारी शाळा कॉलेज सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शिक्षणाची गरज भासू लागली. ९ एप्रिल १९२१ रोजी गुलाबचंद हिराचंद दोशी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय शिक्षणासाठी सोलापूरमध्ये शाळा सुरु केली. ते स्वतः शिक्षक म्हणून काम करीत होते. या शाळेत त्या वर्षी १५० पेक्षा जास्त विद्यार्थी होते.[२४] अशाच प्रकारची एक शाळा सोलापूरजवळ गुंजोटी याठिकाणी राजुलमती शहा यांच्या नेतृत्वाखाली सुरु केली होती.[२५]

सविनय कायदेभंग चळवळीत सोलापूरमध्ये महत्वपूर्ण घडामोडी घडून आल्या.माणिकचंद शहा सोलापूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष असताना नगरपालिकेवर युनियन जॅकऐवजी तिरंगा झेंडा फडकविण्याचे मिटींग घेवून ठरविण्यात आले. ६ एप्रिल १९३० रोजी अण्णासाहेब भोपटकर या गांधीवादी नेत्याच्या हस्ते झेंडा फडकाविला. म्हणून सरकारने माणिकचंद शहा यांना अटक करून सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा दिली.[२६] गांधीजींना ५ मे १९३० रोजी अटक झाल्यानंतर सोलापूरमध्ये जंगलसत्याग्राहाला सुरवात झाली. पोलीस गोळीबारात शंकर शिवदारे हा तरुण ठार झाला. तो सोलापूरचा पहिला हुतात्मा ठरला. त्यानंतर लोकांनी रौद्र रूप धारण करून सर्व शहरावर ताबा मिळविला. परिणामी सरकारने १३ मे ते ३० मे दरम्यान मार्शल लॉ घोषित करून शहरावर लष्करी कायदा लागू केला. मल्लपा धनशेट्टी, कुर्बान हुसेन, किसान सरडा व जगन्नाथ शिंदे यांना फाशीची शिक्षा दिली.[२७] १९४२ च्या चाले जाव चळवळीदरम्यान सुमतीबाई शहा यांनी चालविलेल्या मुलींच्या वसतिगृहातून राजमती पाटील यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. त्यामुळे तिला अटक झाली. व येरवडा जेलमध्ये पाठविले. त्यानंतर तिने आपले सर्व आयुष्य स्वातंत्र्य चळवळीला वाहून घेतले. पुढे स्वातंत्र्य चळवळीत सातारा येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या ‘प्रती सरकार’मध्ये काम करून नागनाथ अण्णा नायकवडी, जी. डी. बापू लाड यांच्या सोबत दरोडे घालणे, सशत्र फौजेची निर्मिती करणे, शस्त्रात्रे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोच करणे, या सारखी कामे करून ती मोठ्या प्रसिद्धीस आली. या चळवळीत पत्रके छापणे व वाटणे हे काम रागांना वैद्य व पी. जे. बुवा यांनी केले. या कामात अनेक विद्यार्थी त्यांना मदत करीत होते. त्यापैकी अनेक विद्यार्थी जैन समाजातील होते.[२८]

## निष्कर्ष:

सोलापूर शहरात पेशवे कालखंडात म्हणजे बऱ्याच उशिरा स्थायिक झालेल्या व संख्येने कमी असलेल्या जैन समाजाने आपल्या कार्य कर्तृत्वाचा ठसा शहराच्या विकासावर उमटविला आहे. शहराच्या विकासाच्यादृष्टीने शैक्षणिक, औद्योगिक, आर्थिक, सांस्कृतिक, क्षेत्रात या समाजाने भरीव योगदन दिले आहे. शहरातील जैन समाजाचा अभ्यास केल्यानंतर पुढील गोष्टी निष्कर्षाच्या रुपाने जाणवतात.

१. **सोलापूर शहराचा बराच मोठा औद्योगिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, अशा सर्वच क्षेत्रातील विकास हा प्रामुख्याने पेशवे कालखंड आणि ब्रिटीश कालखंडात घडून आल्याचे दिसून येते. याच कालावधीत जैन समाज सोलापूरमध्ये येवून स्थायिक झाला.**

२. सोलापूरमध्ये अनेक जाती धर्माचे लोक राहतात. कांही कारणावरून त्यांच्यात संघर्षही घडून आला आहे. मात्र जैन समाजाचा इतर समाजातील लोकांबरोबर कोणत्याही कारणावरून संघर्ष घडून आल्याचे दिसत नाही.

३. जैन समाजाने आपले धार्मिक कार्य चालविण्यासाठी सोलापूरमध्ये चतुर्विधदान शाळा सुरु केली. तीच्यामार्फत दानधर्म करणे हा उद्देश होता. ज्ञानदानासाठी सुरु केलेल्या पाठशाळेचे रुपांतर मोठ्या शैक्षणिक संस्थेत झाले. सोलापूरमध्ये या संस्थेच्या विविध प्रकारच्या वीस शाखातून सोलापूरमधील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळत आहे. त्याद्वारे सोलापूरच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळाली आहे.

४. या चतुर्विधदान शाळेच्या वतीने शहरातील पहिले वसतिगृह सुरु करून शहरात वसतीगृहांची चळवळ सुरु केली. सोलापुरातील इतर जात धर्माच्या लोकांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेवून आपापल्या जातीच्या मुलांसाठी स्वतंत्र वसतीगृहे सुरु केली.

५. शहरात पांजरपोळ सुरु करून गायींना संरक्षण देवून संवर्धन केले. त्या कालखंडात शेतीच्या मशागतीसाठी बैलांची आवश्यकता होती. उत्तम बैलांची पैदास होण्यासाठी गायींचे संवर्धन करण्याचे काम या समाजाने केले.

६. शहरातील गरजू लोकांना मोफत औषध पुरवठा करण्यासाठी औषधालय सुरु केले. या औषधालायला जोडून मोफत दवाखाना सुरु केला. पुढे शहरातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रशिक्षण देण्यासाठी वैद्यकीय कॉलेज सुरु केले.

७. सोलापूर शहर गिरणगाव म्हणून ओळखण्याएवढा सुत गिरण्या व कापडगिरण्यांचा विकास ब्रिटीश कालखंडात घडून आला. या कपडगिरण्यांच्या विकासात लिंगायत आणि जैन समाजाचा मोठा हातभार होता. त्यातही शारातीलच नव्हे तर आशिया खंडातील सर्वात मोठी कापडगिरणी म्हणजे जुनी मिल जैन समाजाने चालविली होती.

८. सोलापूर शहराच्या औद्योगिक विकासासाठी उपयुक्त ठरणाऱ्या तांत्रिक शिक्षणासाठी १८९९ मध्ये दोन औद्योगिक शाळा सुरु केल्या. या दोन शाळांपैकी एक शाळा मुलींसाठी व दुसरी मुलांसाठी होती.

९. सोलापूर शहरातील विविध सार्वजनिकसंस्थांच्या विकासात जैन समाजाची भूमिका महत्वाची आहे. या संस्थांच्या उभारणीबरोबरच या संस्था ज्यावेळी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्या, अशा प्रत्येकवेळी मदत करण्यात हा समाज आघाडीवर राहीला असे दिसते.

१०. जैन समाजाने शहरात अनेक शैक्षणिक संस्था चालविल्या आहेत. त्याचबरोबर विविध शैक्षणिक संस्थांना मदत करून आणि शहराच्या विकासाच्या दृष्टीने त्यांचे महत्व जाणून शहराच्या शैक्षणिक विकासात मोलाचे योगदान दिले.

११. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जो लढा चालू होता त्यात शहरातील हलचालीत जैन समाजाने नेहमीच आपले योगदान दिले. राष्ट्रीय शिक्षण, पैसा फंड, टिळक स्वराज फंड, सविनय कायदे भंग, १९३० चा मार्शल लॉ, चाले जाव चळवळ, सातारचे प्रती सरकार, क्रांतीकारकांना मदत करणे, हैद्राबाद मुक्ती संग्राम इत्यादी अशा प्रकारच्या स्वातंत्र्यासाठीच्या प्रत्येक लढ्यात या समाजाने आपले योगदन दिले आहे.

## संदर्भ साधने

१ . दैनिक सोलापूर समाचार, ४ जून १९६४, पृ.३.
२ . कित्ता, २३ डिसेंबर १९३२, पृ. ३.

३. मंगुडकर डी. बी., दानवीर शेठ हिराचंद नेमचंद व्यक्ती आणि कार्य, मौज प्रिटींग ब्यूरो, मुंबई, १९६७, पृ. १०२.
४. बिडकर राजेंद्र, (संपा), गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन बोर्डींग अमृतगाथा, संमती मुद्रणालय सोलापूर, १९८४, पृ. सिंहावलोकन, २ आणि ६.
५. दैनंदिनी, गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन बोर्डींग , ७ जून १९४८.
६. भोमाज जीवेंद्रदादा,(संपा), कै. शेठ गोविंदजी रावजी दोशी स्मृतिग्रंथ,सोलापूर, १९७८, पृ.३५.
७. पाटील रावसाहेब(संपा.), शेठ गोविंदजी रावजी दोशी आयुर्वेद कॉलेज,रौप्य महोत्सवी स्मरणिका, १९८९, पृ. दिलेले नाही.
८. मंगुडकर डी. बी.,उपरोक्त, पृ. १०२.
९. तिवारी बी.डी.(संपा.),अकॅडमिक्स, वार्षिक, सोलापूर कॉलेज सोलापूर, १९६७, पृ.२-३.
१०. जक्कल व्ही. एन., सोलापूर शहराचा इतिहास, सोलापूर समाचार प्रेस, सोलापूर, १९२५, पृ.७०.
११. मंगुडकर डी. बी.,उपरोक्त, पृ. १०२,१०३, २०२,२०३.
१२. दैनिक सोलापूर समाचार, २० मे १९४८ , पृ.३.
१३. मंगुडकर डी. बी.,उपरोक्त, पृ. २०२ व२०३.
१४. पाटील जी. के.(संपा.), संकल्प, नवनामकरण समारंभ स्मरणिका, सोलापूर कॉलेज सोलापूर, १९८०, पृ. दिलेले नाही.;तिवारी बी.डी.(संपा.), उपरोक्त, पृ.५.
१५. हस्तलिखित, हिराचंद नेमचंद ग्रंथालय, सोलापूर, १९५७, पृ. १२.
१६. पुंडे एन.टी.(संपा.), स्मरणिका, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघटनचे ३८ वे अधिवेशन, १९८९, पृ. दिलेले नाही.
१७. जोशी एस.बी., अमृत महोत्सव स्मरणिका,सरस्वती मंदिर, सोलापूर, १९७०, पृ. ४-७;दै. कल्पतरू आणि आनंदवृत्त, १२ जानेवारी १९४७,पृ.२.
१८. दोशी कुमुदिनीबाई, हिरक महोत्सव स्मरणिका, सेवासदन, सोलापूर, १९९८,पृ.१०-१८.
१९. इराबत्ती ए. एल., माझ्या आयुष्यातील टिपणे, समाचार प्रेस सोलापूर, १९७१,पृ. ५.
२०. मुंबई पुरातत्व विभाग, शिक्षण विभाग, खंड. ॥, १९००, पृ. ४०; मुंबई पुरातत्व विभाग, शिक्षण विभाग, फाईल नं.३६८, १९०१, पृ. २३५.
२१. नाटके अरविंद, उद्योगपती वालचंद हिराचंद, सुमेरू प्रकाशन, मुंबई, १९८७, पृ. प्रकाशकीय.
२२. दोशी कस्तुरबाई, क्रांतिकारक हिराचंद, श्राविका, ऑगस्ट १९९२.
२३. संमती, वर्ष आठवे, अंक पहिला, ऑगस्ट, १९५७, पृ. ८.
२४. काक्रंबे ए. एस., आधुनिक जैन गुरुकुल शिक्षण पद्धती व सामाजिक विकास, श्री. बाहुबली विद्यापीठ, कोल्हापूर, १९९१, पृ. ६०-६१.
२५. जंगम जे.ए.,सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, अप्रकाशीत पीएच. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९९५, पृ. ९०.
२६. शहा सुमतीबाई, माझी जीवन गाथा, श्राविका संस्थानगर, सोलापूर, १९८९, पृ. १२-१३.
२७. लोकराज्य, ५२-११, डिसेंबर, २०००, पृ. ९.
२८. अनदुरकर व्ही. जी., सोलापूर मार्शल लॉ आणि चार हुतात्मे, सोलापूर, १९५८, पृ. १३, १७ व १८.
२९. येवले एस. बी., सोलापूर जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती दिन सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, प्रकाशन वर्ष दिलेले नाही, पृ.४१-५२.